# जन वाचन आंदोलन




जनवाचन आंदोलन हे पुस्तकांना गावागावात घेऊन जाणारे आंदोलन आहे. नवसाक्षर व अर्धशिक्षित लोकांमध्ये पुस्तकांचे सामुदायिक वाचन करणे, ते ऐकणे आणि ऐकवणे हा याचा उद्देश आहे. आज गावातल्या लोकांपर्यंत पुस्तके पोचत नाहीत. त्यांची भाषा त्यांना उमगत नाही आणि किमती परवडत नाहीत. अशा नववाचकांपर्यंत पुस्तके पोचवण्याचे काम भारत ज्ञान विज्ञान समितीने अंगिकारले आहे. ही पुस्तके प्रसिद्ध लेखकांची आणि सोपी, सुटसुटीत व स्वस्त किंमतीत असावीत असा प्रयत्न आहे.

या आंदोलनातून काय साध्य होईल?

गावागावात जनवाचनाची व जनवाचनालयांची संस्कृती निर्माण होईल. साक्षरता आंदोलनातून हस्तगत केलेली अक्षरकौशल्ये लोक स्वत: विकसित करू शकतील. त्यांच्या ज्ञानविज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जाणिवांची पातळी उंचावू शकेल. आपल्या मूलभूत हक्कांच्या आणि एकंदर परिवर्तनाच्या लढ्यासाठी जागृत होऊन ते उभे ठाकू शकतील.

देशातील लोकशाही टिकण्यासाठी आणि अर्थपूर्ण होण्यासाठी हे आवश्यक आहे. साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळख नव्हे तर संपूर्ण जग जाणण्याचे ते कार्य आहे. या दिशेने, गावागावातील लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून, आम्ही पुढे जाऊ इच्छितो.




**भारत ज्ञान विज्ञान समिती**

किंमत रु. २-५०

# कथा गमतीच्या

**नीलम जगदाळे**
**रोजाकुमार**



**भारत ज्ञान विज्ञान समिती**

पुस्तकाचे नाव : कथा गमतीच्या

कथा : पाटलाचा चष्मा
लेखक : नीलम जगदाळे
चित्रकार : आरती कुबेर

कथा : पाच रुपयाची फजिती
लेखक : रोजाकुमार (तामिळनाडू)
अनुवाद : प्रा. पी.के. शशीधरन् (इंग्रजी)/त्रिलोक दत्त(मराठी)
चित्रकार : यश कळवणकर (यूथ आर्टिस्टस् ऑर्गनायझेशन, पुणे )

निर्मिती सहाय्य : श्री.न. गुत्तीकर

जवाआं/३०

प्रकाशन : जून १९९७

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समिती तर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित

मूल्य : २ रुपये ५० पैसे

© सर्वाधिकार भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र)


प्रकाशक : दत्ता देसाई
राज्य समन्वयक, भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र)
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ, पुणे ४११०३०
फोन : ४५६६९४
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४११००४

अक्षर जुळणी व मांडणी : दिनानाथ मनोहर

# पाटलाचा चष्मा

सोलारपूर नावाचं एक छोटंसं गाव होतं. त्या गावात रामप्पा राहत होता. रामप्पा स्वभावानं शांत होता. विनम्र आणि हसतमुख रामप्पा सर्वांना आवडायचा. म्हटलं तर तो एक व्यापारी होता, पण व्यापारी म्हणजे काय? तर तो एक दुकानदार होता. त्याच्या दुकानात आलेलं गिऱ्हाईक रिकाम्या हातानं कधी परत जात नसे. पण हो, त्याच्या दुकानात कधीच घासाघिस,वादावादी होत नसे. आश्चर्य वाटलं? ओळखा पाहू रामप्पाच्या दुकानात असं काय होतं ते?

अंधारात चाचपडणाऱ्याला दिवा दाखवल्यावर जसं वाटतं ना, तसंच रामप्पाच्या गिऱ्हाईकांना वाटे. अजून नाही आलं



लक्षात, रामप्पाचं दुकान कशाचं होतं ते? दिव्याचं? नाही हो, रामप्पाचं दुकान होतं चष्म्याचं! चष्मा म्हणजे चाळीशीनंतर तर जवळ ठेवावीच लागते अशी वस्तू. अतिशय आवश्यक. कधी ना कधी लागणारी. वयस्क माणसाला आपल्या जवळ असलेला बरा असं वाटणारा हा चष्मा.

रामप्पा गिऱ्हाईकांची खूप काळजी घेत असे. चष्मा घालून

आपल्या गिऱ्हाईकांना जास्त चांगलं दिसावं असं त्याला वाटे. आणि चष्मा गिऱ्हाईकांना खुलून दिसावा असंही त्याला वाटे. त्याच्या दुकानात एक मुळाक्षरांचा तक्ता टांगलेला होता. नीट खुर्ची ठेवलेली होती. समोर आरसा सतत तयार असे.

रामप्पाच्या दुकानाची कीर्ती सगळीकडं पसरलेली होती. त्याच्या दुकानाचा जम आता चांगला बसला होता. चष्म्यासाठी लोक हमखास त्याच्याकडंच येत असत. पण एक दिवस असा उजाडला की रामप्पाला दुकान बंद करावं लागेल की काय अशी वेळ आली. एवढ्या चांगल्या माणसाचं असं कसं होईल म्हणता? सांगू? ऐका तर.



त्यादिवशी सोलारपूरचे सरपंच दादासाहेब पाटील सकाळीच रामप्पाच्या दुकानात आले. रामप्पानं लगबगीनं त्याचं स्वागत केलं. खुर्ची दोन दोनदा झटकून पुढं ठेवली. पाटलांनी सगळीकडं नजर फिरवली. मग ते खुर्चीवर बसले. समोर मांडलेल्या काचेच्या कपाटाकडं बघत म्हणाले, ''नाई, वाईच चष्मा घ्यावा म्हणतो. लई ऐकलया, तुमच्या चष्म्यामुळं लोकास्नी वाचाय



येतं म्हणून. म्हणलं परतक्षच बघून खात्री करावी. म्हणून आलो बघा!''

रामप्पाला जरा बरं वाटलं. चला, म्हणजे पाटील चष्मा घ्यायला आलेत तर. झालं! रामप्पानं केली सुरुवात. चष्मा पाटलांच्या नाकावर ठेवत त्यानं समोरच्या तक्त्याकडं बोट




दाखवलं आणि विचारलं, ''दादासाहेब जमतयं का वाचायला?'' ''न्हा.ऽयी!'' दादासाहेब म्हणाले. रामप्पानं तो चष्मा बाजूला ठेवला. दुसरा उचलला. एकेक डोळा बारीक करून स्वत: पाहिला. मग तो चष्मा पाटलाच्या नाकावर ठेवत विचारलं, ''आता दादासाहेब, येतयं का वाचायला?'' ''छ्या'' दादासाहेब उद्गारले.

असे पाच सात चष्मे बाजूला ठेवले गेले. दादासाहेबांच्या चेहऱ्यावर नाराजी दिसत होती. ''हरकत नाही, हरकत नाही'' असं पुटपुटत रामप्पानं लगबगीनं आणखी एक चष्मा पुढं केला. ''आता ह्या चष्म्यानं नक्की वाचता येईल बघा.''

''ऊं..हूं'' दात आवळून पाटील गुरगुरले. पाटलांच्या रागाचा पारा चढत होता. रामप्पा अस्वस्थ झाला. आणखी एक चष्मा पुसून त्यानं पाटलांच्या नाकावर ठेवला आणि अदबीनं, दबकत, दबकत विचारलं, ''आता तरी हो, दादासाहेब?''

''नाही, नाही, नाही.'' असं जोरात ओरडून दादासाहेब ताडकन् उठून उभे राहिले. ''काय फसवा-फसवीचा धंदा



करताय का काय? आँ? नुसता खेळ मांडलाय. आमची ही गत तर गरीब लोकांना किती फशिवता?''

आता मात्र रामप्पा चांगलाच घाबरला. त्याच्या घशाला कोरड पडली. काय बोलावं काही सुचेना. हाताला धरून त्यानं पाटलांना खुर्चीत बसवलं. पुन्हा चष्मे दाखवले. पण पाटलांना काही पुढ्यातलं वाचता येत नव्हतं. आता मात्र धीर करून बोललंच पाहिजे, रामप्पानं मनात विचार केला. मगापासून सारखी मनात डोकावणारी शंका अतिशय नम्रपणानं रामप्पानं विचारली.

''नाही म्हटलं पाटीलसाहेब, एक प्रश्न विचारू का? पण



रागावू नका बरं का!'' पाटलांनी भुवया वर उचलून रामप्पाकडं बघितलं. नजरेनंच 'विचारा' असं दर्शवलं. ''नाही म्हणजे.. म्हणजे आपल्याला आधीपासून वाचता येतं का दादासाहेब?'' चाचरत चाचरत रामप्पानं विचारलं. हे ऐकताच खुर्चीवरून ताडकन् उठत पाटील गरजले, ''वाचता येत असतं तर चष्मा घ्यायला कशाला आलो असतो, आँ?''

रामप्पाला क्षणभर काय बोलावे हेच सुचेना. येणारं हसू दाबत आणि चेहरा गंभीर ठेवत अतिशय हळूवारपणे त्यानं पाटलांना पुन्हा खुर्चीत बसवलं. आणि मग तेवढ्याच नम्रपणे पाटलांना सांगितलं की चष्मा हा वाचण्यासाठी नाही तर दिसण्यासाठी मदत करतो. ज्याची नजर मंद झाली असेल, ज्याला नीट दिसत नसेल, त्याला चष्म्यामुळं स्पष्ट दिसतं. दृष्टिदोष असणाऱ्यांचा दोष त्यामुळं दूर होतो. पण जो वाचायला शिकलाय त्यालाच चष्म्यामुळं वाचता येतं. मुळातच वाचता न येणाऱ्याला आपोआप वाचता येण्याची जादू चष्म्यामुळं होत नाही. हे सारं त्यानं समजावून सांगितलं. नाईलाज झाल्यासारखा चेहरा करून पाटील गप्प राहिले. पण त्यांचा चेहरा निराश दिसत होता.

क्षणभर विचार करून रामप्पानं एक सुंदर तोडगा पाटलांना सुचवला. पाटलांनी मान डोलावली. आणि मग दररोज संध्याकाळी दुकान बंद करून रामप्पा पाटलांच्या वाड्यावर जाऊ लागला. अ आ इ ई चे आणि साक्षरतेचे पाठ तो घेऊ लागला. हळूहळू पाटलांबरोबर इतरही मंडळी बसू लागली. रामप्पा त्या सर्वांसाठी पाठ घेऊ लागला. असं करता करता शेवटी पाटील लिहाय-वाचायला शिकले. त्यांच्या घरातली मंडळी देखील वाचायला शिकली, लिहायला शिकली. आणि मग हे एवढ्यावरच थांबलं नाही. तर काही दिवसांनी पाटलांनी स्वत:च

गावात शाळा सुरू करून घेतली. सोलारपूरला थेट तालुक्यावरून मास्तर येऊ लागले. आणि हो, रामप्पाचं दुकानही व्यवस्थित सुरू राहिलं.

मामलेदार कचेरी, बस स्टॉप, दवाखाना, पोलिस स्टेशन



कुठं म्हणून कुठंही पाटलाचं काम अडेनासं झालं. सोलारपूरच्या लोकांना हळूहळू साक्षरतेचं महत्त्व पटू लागलं.

आता पाटील रोज रामप्पाच्या दुकानावर येतात. कधी एकटे कधी आणखी कुणाला घेऊन. बरोबर आलेला माणूस वाचता न येणारा असेल तर त्याला रामप्पाकडं सोपवतात. आणि त्याला नीट दिसत नसेल तर रामप्पाकडून आधी चष्मा घ्यायला लावतात.

(आधारित)



# पाच रुपयांची फजिती

हिरानं डोक्यावरची द्राक्षाची टोपली खाली उतरवली. चिंचेच्या सावलीखाली बसली. ती तिची नेहमीची जागा होती. एस.टी. स्टँड आणि तहसीलदार कचेरीच्या रस्त्यावर मधोमध होतं ते झाड.

आज तिनं छान द्राक्षं आणली होती. 'उन्हापासून जपली पाहिजेत' तिच्या मनात विचार आला.

टोपलीवरचं पोतं तिनं हातात घेतलं. आतला काटा आणि वजनं बाहेर काढली. पोतं नीट करून जमिनीवर अंथरलं. पदराच्या टोकानं चेहऱ्यावरचा घाम खसखसून पुसला. आता ती तयार झाली होती.

चेहऱ्यावर हसरा भाव आणून ती ओरडली, ''द्राक्षं घ्या वो द्राक्षं. गो.ऽ.ऽ..ड द्राक्षं!''

थोडा वेळ असाच गेला. एक गिऱ्हाईक तिच्याकडं आलं. ''कशी दिली द्राक्षं?'' त्यानं विचारलं. हिरानं चांगला रसरशीत घड उचलून समोर धरला.''तीन रुपये पाव''ती म्हणाली.

त्या माणसानं घडातलं एक द्राक्ष तोडून तोंडात टाकलं. द्राक्षं गोड असल्याचं त्याच्या चेहऱ्यानं सांगितलं.''पाच रुपयाला अर्धा किलो दे''तो म्हणाला. हिराबाई काहीच बोलली नाही. म्हणजे तिला तो भाव मंजूर होता. त्या माणसानं घड उचलून दिले. तिने ते काट्यावर तोलले. कागदात गुंडाळून पुडा करून दिला.


त्या माणसानं पैसे दिले. तिच्या हातावर पाच रुपयांचं नाणं चकचकलं. जणू काही आठ आण्याचं नाणंच. फक्त जरा जाड आणि नवं कोरं, चकचकित. तिनं ते नाणं दोन्ही

डोळ्यांना लावलं. बोहोनी झाली!

तिने ते नाणं क्षणभर तळहातावर ठेवलं. प्रेमानं त्याला थोपटलं. पोत्याखाली सरकवलं.

पाच रुपयाचं हे नाणं. आता तिच्या पक्कं ओळखीचं झालं होतं. पण तिनं पहिल्यांदा ते पाहिलं तेव्हा? तो प्रसंग तिला आठवला.

तिच्या बहिणीची लेक गौरा तिच्याकडं रहायची. लग्न करून द्यावं अशा वयाची. हिराला मदत करायची. कधी घरकामात, कधी बाजारात. त्या दिवशी सकाळी गौराच केळी घेऊन बसली होती. हिरा जरा मागाहून आली.



आल्या आल्या गौराला म्हणाली, ''जा, एक वडापाव अन् एक च्या आन. दोघीबी घेऊ.'' गौरा उठली. पोत्याखालून तिनं एक नाणं उचललं. हिराला वाटलं आठ आण्याचं नवं कोरं चकचकीत नाणं असावं. तिनं काही विचारण्याआधीच गौरा झपझप गेलीसुद्धा.

पलीकडच्या गाडीवरून तिनं वडा अन् चहा उचलला.



नाणं दिलं. त्यानंही तिला काहीतरी दिलं. ती वडेवाल्याक‍ बघून हसली. परत आली. हिरासमोर वडाचहा ठेवून तिनं बसकण मारली. हातातलं नाणं पोत्यावर टाकलं. ते आठ आण्याचं होतं!

हिरा चक्रावली. आठ आण्यात वडापावचहा आणि पुन्हा आठ आणे परत? ही काय भानगड? की गौरा आणि वडेवाला यांच्यात काही भानगड आहे? हिराचं डोकं तापलं. तरी तिनं राग आवरला आणि विचारलं, ''किती पैसं नेलतंस गं! वडेवाल्याची लई मेहरबानी दिसती तुझ्यावर?''

हिराच्या आवाजातला तिरकसपणा गौराला चांगलाच बोचला. तिच्या मनात संतापाचा डोंब उसळला. ती तडक वडेवाल्याकडं गेली. त्याच्याकडून ते चकाकणारं नाणं घेऊन आली. ते नवं, पाच रुपयाचं नाणं होतं.

ते पाहून हिराला सारा उलगडा झाला. ती शरमली. तिला राग आला त्या नव्या नाण्याचा आणि स्वत:च्या अडाणीपणाचा!

ती एकदम भानावर आली. समोरच्या द्राक्षांकडं तिचं लक्ष गेलं. किती छान आणि गोड आहेत द्राक्षं. तिच्या मनात विचार आला, सगळी लवकर खपतील. रात्र पडण्याआधीच घरी जाता येईल. पोरांना कुशीत घेऊन थोपटता येईल. मुलांच्या आठवणीनं तिला एकदम तरतरी आली.

तासाभरात आणखी काही गिऱ्हाईकं झाली. ऊन हळूहळू तापायला लागलं होतं.

इतक्यात एक म्हातारी आली. ''ए बाई..कशी दिली द्राक्षं?''तिनं विचारलं.

''तीन रुपये पाव.''हिरा म्हणाली.

''दे पाव किलो,'' म्हातारी म्हणाली.



हिरानं पुडा तिच्या हाती दिला. म्हातारीनं पन्नास रुपयांची नोट दिली. हिरानं सगळ्या नोटा गोळा केल्या. चाळीस रुपये भरले. शेवटी तिला नाणी काढावी लागली. एकेक रुपयाची दोन नाणी आणि पाच रुपयाचं नाणं असे हिराने बाहेर काढले. झाले सत्तेचाळीस रुपये!

म्हातारीनं ते पैसे घेतले. घाईघाईनं म्हातारी निघून गेली.

एवढ्यात एक स्कूटरवाला थांबला. हिरानं त्यालाही द्राक्षं विकली.

आता सूर्य डोक्यावर आला होता. उन्हाची तिरीप आता डोळ्याला सहन होत नव्हती. गाड्या गेल्या की रस्त्यावरची तापलेली धूळ नाकातोंडात जात होती. हिराचा घसा सुकला होता. डोक्यावर पटकूर टाकून ती कितीतरी वेळ बसून होती.

एवढ्यात समोरून म्हातारी आली. मघाशी ५० रुपयांची नोट देणारी म्हातारी होती ती. ''अगं ये बये..'' ती ओरडली.



हिराचा चेहरा त्रासिक झाला.

''पन्नास रुपयातनं तीन गेलं तर किती उरतात गं?'' म्हातारीनं खेकसून विचारलं.

''आजी मी तुम्हाला बरोबर सत्तेचाळीस दिलं की'' हिरा शांतपणे म्हणाली.

''खोटारडी!''म्हातारी जोरात ओरडली,''तू बेचाळीस रुपये अन् वरती आठ आणे दिलंस फक्त. तुला काय वाटलं? मी म्हातारी म्हणून फसलं व्हयं?''

म्हातारी ओरडून ओरडून पुन:पुन्हा तेच बोलत होती.

क्षणभर हिराला काय बोलावं तेच सुचेना.

''टाक माझं साडेचार रुपयं''म्हातारी हात नाचवत म्हणाली.

''म्हातारे, मी तुला सत्तेचाळीस रुपयं दिलं.''हिरा उलट ओरडली,''चाळीस रुपयाच्या नोटा, एकेक रुपयची दोन नाणी आणि पाच रुपयंच एक नाणं''

''न्हायी.. न्हायी''म्हातारी मान हलवून जोरात ओरडली.

त्यांच्याभोवती एक घोळका जमला. भांडणाची गंमत बघायला.

''ही बया मला फशिवती''म्हातारी लोकांकडं बघून ओरडली. हिरानं लोकांना ५ रुपयांच्या नाण्याबद्दल नीट सांगितलं. पण म्हातारी ऐकायला तयार नव्हती.

''मी तुला दिल्यालं सगळं पैसं ठेव इथं'' हिरा ओरडली, ''बघूं दे मला.''

म्हातारीनं चंची काढली. लोकांसमोर ती उपडी केली.

दहा रुपयांच्या तीन नोटा समोर पडल्या. ''साडेसहा रुपयचा गूळ, अडीच रुपयची फुलं, साडेतीन रुपयचे शेव-चुरमुरे'' म्हातारी हिशेब घालत होती.

गर्दीतली एक बाई ओरडली, ''म्हातारीला फसवती व्हय गं?'' हिराला रागा आवरेनासा झाला.''या म्हातारीनं पाच रुपयंच नाणं आठ आणं समजून कुठंतरी दिऊन टाकलं...'' हिरा ओरडली,''आंधळी कुठली..''

'आंधळी' शब्द ऐकून म्हातारी आणखी खवळली. आरडाओरड करू लागली.

''बिच्चारी. पाच रुपयाला आठ आणं समजली'' एक सुशिक्षित दिसणारा माणूस म्हणाला, ''पहिल्यांदा माझाही असाच गोंधळ झाला होता...''



''काय कळत नाही बघा'' दुसरा माणूस म्हणाला, ''नवं दोन रुपयाच नाणं एका रुपयासारखं दिसतं आणि हे पाच रुपयाचं आठ आण्यासारखं .. सगळा गोंधळ नुसता.''

''पण मी म्हनतो सरकारला एवढं कळत न्हायी? एवढा गोंधळ करावाच का? कशाबद्दल अशी नाणी काढावी?'' तिसऱ्यानं विचारलं.

''न कळायला काय झालं? सरकारनं एवढी महागाई करून ठेवलीय. आठ आण्याच्या गोष्टीला आता पाच रुपयं पडायला लागलेत.''

कुणीतरी म्हणालं, ''म्हणून नाणीपण तशीच...''

''हे बाकी खराय...'' असं म्हणून लोक हसले. काहीजण निघून गेले. पण म्हातारीचा आरडाओरडा चालूच होता. हिराला शिव्याशाप देत अजून ती तिथंच होती.

''माझं पैसं पचणार न्हायीत तुला'' असं ओरडत ती म्हातारी एकदम वाकली आणि दोनचार मुठी माती उचलून तिनं द्राक्षांवर फेकली.

हिराला काही कळायच्या आधीच हे घडलं. तिनं राग आवरला. येणारं रडू कसंबसं आवरलं. पाय आपटत, ओरडत म्हातारी निघून गेली.

खराब झालेली द्राक्षं कशी विकायची आता? हिराला प्रश्न पडला. लवकर द्राक्षं विकून घरी जायचा विचारही ती विसरली. मुलांना कुशीत घेऊन बसायचं स्वप्न विरून गेलं.

एका माणसानं एक घड उचलला. पाहून तो खाली ठेवला. ''धुवून विक आता, बाई'' असं म्हणत वळला. ''बिच्चारी'' कुणीतरी म्हणालं. घोळका पांगला.

हिरा तशीच बसून होती. तिच्या डोळयात आसवं जमली होती.

*****